# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २१/०९/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

### पोस्टे अरोली हद्दीतील अवैधरीत्या मोहाफुल दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक कारवाई

आज दि. २१/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली चे ठाणेदार सपोनि स्नेहल राऊत, यांच्या आदेशाने अधिकारी व स्टॉफसह पोलीस स्टेशन अरोली हद्दीत पेट्रोलींग करित असतांना विविध ठिकाणी मुखबीर द्वारे पक्की माहीती मिळाल्याने सपोनि स्नेहल राऊत, पोस्टे अरोली ठाणेदार यांच्या सह पोउपनि सोनवने यांनी सापळा रचुन मौजा सिरसोली आणि धर्मापुरी येथे मोहाफुलाच्या दारू विक्रेत्यांवर धाडी टाकुन लाखोंचा माल जप्त करण्यात आला. त्यामध्ये एकुण ०६ आरोपींविरूध्द तीन गुन्हे दाखल करून ५ आरोपींना अटक करण्यात आली. त्यामध्ये मौजा सिरसोली येथील संजय धनराज जगदेवे यांच्या घरून मोहाफुलाची हातभट्टीची ६० लिटर दारू किंमती अं. ३०००/— रू. ची मोहफलाची दारू जप्त करण्यात आली. तसेच मौजा धर्मापुरी येथील रामेश्वर माधवराव उके व सचिन रामेश्वर उके यांच्या कडे धाड टाकुन मोहफुलाची हातभट्टीची ९० लिटर दारू किंमती अं. ४५००/— रू. ची मोहाफुलाची दारू तसेच एक पल्सर मोटार सायकल MH 40 CV 6341 किंमती अं. ९०,०००/—रू. असा एकुण ९४,५००/—रू. रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचबरोबर मौजा धर्मापुरी येथीलच अमोल सत्यवान चारमोडे, रूपेश सत्यवान चारमोडे, सत्यवान इठोबा चारमोडे यांच्या कडुन एक मोबाईल फोन किंमती अं. १०,०००/—रू. आणि हातभट्टीची मोहफुलाची ८० लिटर दारू, किंमती ४०००/— रू. असा एकुण १४,०००/— रूपयाचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

वरिल प्रमाणे अरोली पोलीस स्टेशन हद्दीत तीन यशस्वी धाड टाकुण मोहफुलाची दारू विक्रेत्यांवर कारवाई करून एकुण २३० लिटर हातभट्टीची मोहफुलाची दारू किंमती एकुण ११,५००/— रूपये, एक दुचाकी मो.सा. किंमती अंदाजे ९०,०००/— रू. तसेच एक मोबाईल किंमती अंदाजे १०,०००/— रू. असा एकूण १,११,५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोस्टे अरोली तर्फे सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन अरोली ठाणेदार स.पो.नि. श्री स्नेहल राऊत, पोउपनि सोनवने, पोहवा बाजनघाटे, पोशि राकेश, सचिन मोटघरे, देशमुख, मोटघरे, तिजारे, मपोशि हेमा, आणि अश्विनी यांनी पार पाडली.

## हुक्का ओढणाऱ्या इसमांवर धाड सावनेर पोलीसांची कारवाई

दि. २०/०९/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, डी अॅड डी रेस्टॉरेंट मध्ये काही लोक बसुन हुक्का पित आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून पोस्टे सावनेर येथील स्टाफ यांनी डी अॅड डी रेस्टॉरेंट मध्ये रेड कारवाई केली असता **आरोपी नामे– १) आयुश बबलु भगत, रा. राममंदीर रोड बाजार चौक, सावनेर जि. नागपूर २) ललीत तुलसीराम सावनकर, वय ३२ वर्ष, रा. खेडकर ले–आउट सावनेर जि. नागपूर ३) गणेश एकनाथ भापोटे, वय २३ वर्ष, रा. डब्लु सी. एल कॉलोनी कॉटर, १२६/०८ वाघोडा साावनेर जि. नागपूर ४) दिनेश परमानंद अमरनाने वय ४० वर्ष, रा. प्लाट नं. ६१६, इंदोरा चौक कामठी रोड पॉल ब्रिक्स समोर नागपूर ५) जय कुशाल बिधानी, वय ४० वर्ष, रा. फ्लॅट नं. २०१ संस्कृती गार्डन अपामेट पिरामिट नेस्ट सी. एम पी डी आय रोड जरीपटका नागपूर ६) आशिश कुमार रेवाचंद डीक, (खात्री) वय ३६ वर्ष, रा. फ्लॅट नं. ३०१ संस्कृती गार्डन अपामेट पिरामिट नेस्ट सी.एम पी डी आय रोड जरीपटका नागपूर ७) आादित्य शारदाप्रसाद श्रीवास्तव वय ४१ वर्ष, रा. फ्लॅट नं. २०२ देविका अपामेट पॉवर ग्रिट चोक रोड जरीपटका नागपूर ८) अंकीत दिनेश बिनवाारे, वय २२ वर्ष, रा. पिपळाडाग बंगला बंडु कुचेकर याचे घरी किरायने ता. सावनेर जि. नागपूर** हे खुर्चीवर बसुन टेबलवर हुक्का पॉट ठेवून पाईपचे मदतीने हुक्का पिताना मिळुन आले. एकुण ०८ इसम यांना ताब्यात घेवुन आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ४, २१ सिगारेट व इतर तंबाकु उत्पादने, अधिनियम २००३ चा सुधारीत अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील, पोउपनि स्वप्नील गेडाम, परी पोउपनि राठोड, डी बी पथकातील पोहवा सुरेंद्र वासनिक रवि मेश्राम, नापोशि रंजन कांबळे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर